Monday, September 22, 2014
4:14 PM

# प्रशांत ठाकूर यांच्या समर्थनार्थ पनवेलमध्ये युवकांची मोटरसायकल रॅली

पनवेल–खारघर टोलनाका रद्द करण्याचे स्पष्ट आश्वासन देवून मुख्यमंत्र्यांनी शब्द न पाळल्याच्या निषेधार्थ आमदार प्रशांत ठाकूर यांनी आमदारकीचा राजिनामा देवून निवडणूक न लढविण्याचा निर्णय घेतला. मात्र कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव त्यांनी निवडणूक लढविण्यास होकार देताच आनंदाचे भरते आलेल्या कार्यकर्त्यांनी पनवेल शहरात भव्य मोटरसायकल रॅली काढून एकच वादा प्रशांत दादा च्या घोषणेने पनवेल शहर दणाणून सोडले.

पनवेल ,नवीन पनवेल खारघर कामोठा वासियांवर अन्यायकारक टोल लादण्यात येणार असल्याने आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्याला कडाडून विरोध केला. भरपावसात रस्त्यावर उतरून आंदोलन केले.त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी खारघर टोलचा स्थानिकाना नाहक भुर्दंड वसत असल्याचे कबुल करून तो रद्द करण्याचे आश्वासन दिले.मात्र अखेरच्या क्षणापर्यंत त्यावर निर्णय मात्र घेतला नाही. मुख्यमत्रिानी दिलेला शब्द न पाळल्याने आमदार प्रशांत ठाकूर यांनी याघटनेचा निषेध म्हणून आमदारकीचा राजिनामा देवून निवडणूक न लढविन्याचा निर्णय घेतला. त्यांच्या या निर्णयामुळे पनवेल शहर व तालुक्यातील कार्यकर्त्यांनी त्यांच्यावर दवाव टाकून आपला निर्णय मागे घेण्याची विनंती केली. कार्यकर्त्यांचा दवाव पाहता आमदार प्रशांत ठाकूर यांनी निवडणूक रिंगणात उतरण्यास होकार दिला.त्यामुळे कार्यकर्त्यामध्ये उत्साहाची एकच लाट उसळली. हा आनंदोत्सव साजरा करण्यासाठी पनवेल शहर व तालुक्यातील युवक कार्यकर्त्यांनी युवानेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल शहरात भव्य मोटरसायकल रॅली काढली.त्यावेळी एकच वादा प्रशांत दादा या घोषणेने शहराचा परीसर दणाणून सोडला.या रॅलीत युवकांनी आमदार प्रशांत ठाकूर यांचे मुखवटे परीधान केले होते.शहरातील विविध चौकात पनवेल वासियांनी या रॅलीचे उत्स्फूर्त स्वागत केले.